**ठळक बातम्या**

- भारताने स्वीकारलं आंतरराष्ट्रीय करार पॅक्स सिलिकाचं सदस्यत्व

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डीपटेक स्टार्ट अप्सच्या प्रमुखांशी संवाद

- AI च्या मदतीने अन्न सुरक्षा, हवामानबदल या आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता वाढवण्यासाठी महाराष्ट्र राज्य सरकार प्रयत्नशील असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- महाराष्ट्रात राज्य शिक्षण मंडळाच्या १०वीच्या परीक्षेला प्रारंभ

**आणि**

- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेतले सुपर एट संघांचे सामने उद्यापासून रंगणार

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात अमेरिकेच्या नेतृत्वाखाली होत असलेला आंतरराष्ट्रीय करार पॅक्स सिलिकाचं सदस्यत्व भारताने स्वीकारलं आहे. नवी दिल्लीत आयोजित एआय इम्पॅक्ट परिषदेत या कारारवर स्वाक्षऱ्या झाल्या. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव आणि अमेरिकेचे भारतातले राजदूत सर्जियो गोर यावेळी उपस्थित होते. भारत अमेरिका व्यापार कराराच्या पार्श्वभूमीवर भारताने हे पाऊल उचलणं महत्त्वाचं मानलं जात आहे. आर्थिक आणि तंत्रज्ञान विषयक सहकार्य आणि पुरवठा साखळीला आधार यादृष्टीनं हा करार महत्त्वाचा आहे.

या करारामुळे संगणकीय चिप्स सेमीकंडक्टर्स उद्योगात भारताला मोठा फायदा असल्याची प्रतिक्रीया अश्विनी वैष्णव यांनी व्यक्त केली.

**- -होल्ड- बाईट वैष्णव - - -**

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीतल्या सेवा तीर्थ इथं आरोग्य सेवा, सायबर सुरक्षा, अवकाश आणि इतर क्षेत्रात उत्तम कामगिरी करणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डीपटेक स्टार्ट अप्सच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी संवाद साधला. या बैठकीत प्रधानमंत्र्यांनी शेती, पर्यावरण संरक्षण आणि मातृभाषेतून उच्च शिक्षणाला चालना देण्यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या शक्यतांवर चर्चा केली. या चर्चेत कृत्रिम बुद्धिमत्ता आणि

डीपटेक स्टार्ट अप्सच्या १६ कंपन्यांचे कार्यकारी अधिकारी आणि संस्थापकांनी या वेळी त्यांच्या कल्पना आणि कार्याची माहिती या बैठकीत दिली.

उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन यांनीही नवी दिल्ली इथं सुरू असलेल्या इंडिया एआय समिटमध्ये सहभागी झालेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि प्रतिनिधींच्या गटाची भेट घेतली. यानंतर समाजमाध्यमावर प्रसिद्ध केलेल्या पोस्टमध्ये उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांनी सांगितलं की, या वेळी झालेल्या बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आरोग्य सेवा, शिक्षण आणि रोजगार यांसारख्या क्षेत्रात लक्षणीय बदल घडवून आणणाऱ्या एआयच्या क्षमतेवर प्रकाश टाकला. तसंच नवकल्पना राबवण्यासाठी भारताची क्षमता उत्तम असल्याचं मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या गटाने सांगितल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांची आज नवी दिल्लीत ब्राझिलचे कृषी मंत्री कार्लोस फॅवेरो यांच्याशी चर्चा झाली. यावेळी दोन्ही देशांमधल्या कृषी सहकार्याबाबत सकारात्मक चर्चा झाल्याचं कृषीमंत्र्यांनी प्रसार माध्यमांना सांगितलं. ब्राझिल भारताला अनेक क्षेत्रांमध्ये सहकार्य करणार असून भारतात त्यांना सेंद्रीय शेतीत स्वारस्य असून ते भारतात एक सेंटर ऑफ एक्सलंसही सुरु करणार असल्याचंही कृषीमंत्र्यांनी सांगितलं….

**- - - होल्ड - बाईट- चौहान - - -**

**<><><><><>**

कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धीमत्तेच्या म्हणजेच AI च्या सहाय्याने अन्न सुरक्षितता, वातावरणातील बदलाला सामोरे जाण्याची क्षमता, महिला सक्षमीकरणासह सर्वांगीण समृध्दी आणण्यासाठी महाराष्ट्र राज्य सरकार प्रयत्न करत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवी दिल्लीत सांगितलं. नवी दिल्लीतील भारत मंडपम् इथं सुरू असलेल्या इंडिया एआय इम्पॅक्ट समिट -२०२६ मधील 'एआय इन ॲग्रीकल्चर' या विषयावरील चर्चासत्रात ते बोलत होते.

सध्या जगभरात शेतीसमोर अनेक आव्हानं आहेत. त्यामुळे अन्न सुरक्षिततेवर ताण आला आहे. अनिश्चित वातावरण, घसरणारी पाणी पातळी, जमिनीचा खालावणारा दर्जा, पुरवठा साखळीतील अडथळे आणि जागतिक मार्केटमधील अनिश्चितता यांचा या

आव्हानांमध्ये समावेश आहे. अशा परिस्थितीत AI महत्त्वाची भूमिका बजावू शकते, असं मत मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केलं.

AI चा शेतीतील वापर ही बाब केवळ प्रदर्शने आणि चर्चेपुरती मर्यादीत न राहता ती सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचायला हवं, अस मत फडणवीस यांनी व्यक्त केलं. महाराष्ट्र सरकारनं महाॲग्री एआय धोरण स्वीकारल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. हे धोरण सर्वांसाठी खुले आणि परस्पर समन्वय साधणारं आहे. त्यावर आधारित विकसित केलेला मोबाईल प्लॅटफॉर्ममधून शेतकऱ्यांना व्यक्तिगतरित्या सल्ला दिला जात आहे. या सेवेला शेतकरी चांगला प्रतिसाद देत असल्याचं त्यांनी सांगितलं. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाचे सचिव देवेश चतुर्वेदी यांनी महाराष्ट्रानं कृषी क्षेत्रात AI तंत्रज्ञानाचा ज्या पद्धतीनं वापर केला आहे, त्याचं कौतुक केलं.

या परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी जागतिक बँकेचे दक्षिण आशिया विभागाचे उपाध्यक्ष योहानिस त्सुट यांच्याशी चर्चा केली. यावेळी कृषी क्षेत्रात होणाऱ्या बदलांना चालना देणं, डिजिटल आणि कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित सेवा मजबूत करणं, रोजगारनिर्मिती वाढवणं आणि तरुणांना शाश्वत रोजगारासाठी आवश्यक डिजिटल कौशल्यांचं प्रशिक्षण देणं या मुद्द्यांवर चर्चा झाली.

**<><><><><>**

महाराष्ट्रात राज्य शिक्षण मंडळाच्या १०च्या परीक्षेला आज सुरुवात झाली. ९ विभागीय मंडळांमधून मिळून १६ लाख १५ हजार ४८९ विद्यार्थी या परीक्षेला बसले आहेत. राज्यभरात एकूण ५ हजार १११ केंद्र असून कॉपीसह इतर गैरप्रकार रोखण्याकरता विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. पोलीस दलाची भरारी पथकं तैनात असून ड्रोनमार्फतही परीक्षा केंद्रावर लक्ष ठेवण्यात येत आहे.

दरम्यान, मंडळाने संकेतस्थळावर जाहीर केलेलं अधिकृत वेळापत्रकच ग्राह्य धरावं असं आवाहन राज्य शिक्षण मंडळाने केलं आहे. परीक्षा १८ मार्चपर्यंत चालेल.

**<><><><><>**

महाराष्ट्रात विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या सोमवारी २३ तारखेपासून मुंबईत सुरु होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस येत्या ६ मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प सादर करतील. सुमारे महिनाभर चालणाऱ्या या अधिवेशनात माजी उपमुख्यमंत्री अजित पवार

यांच्या मृत्यूप्रकरणावर विरोधक सरकारला घेरण्याची शक्यता आहे. अजित पवार यांच्या मृत्यूनंतर मुख्यमंत्र्यांनी त्यांचं अर्थखातं स्वतःकडे ठेवलं असून ९ कोटी रुपयांच्या तुटीचा प्रश्न ते कशा प्रकारे सोडवतील हे महत्त्वाचे असल्याचं राजकीय निरीक्षकांचं मत आहे. राज्यपालांच्या अभिभाषणानं अधिवेशनाची सुरुवात होणार असून त्यानंतर माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाचा शोकप्रस्ताव सादर होईल. अजित पवार यांच्या विमान अपघाताची सखोल चौकशी करण्याची मागणी आमदार रोहित पवार यांनी केली असून या अधिवेशनात हा मुद्दा गाजण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. अधिवेशन काळातच राज्यसभेच्या सात जागांसाठी निवडणूक होणार आहे. राज्यसभेच्या एकूण ७ जागांपैकी एक जागा काँग्रेस आणि एक शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला मिळण्याची शक्यता आहे.

**<><><><>**

बिहार विधानसभेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत विजयी झालेल्या एकूण ४२ आमदारांना पाटणा उच्च न्यायालयानं नोटीसा बजावल्या आहेत. मतदान प्रक्रियेतील अनियमितता आणि उमेदवारी अर्ज भऱताना सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात चुकीची माहिती दिल्या प्रकरणी त्यांच्यावर विविध ठिकाणी याचिका दाखल झाल्या होत्या. यामध्ये राष्ट्रीय लोकशाही दलाच्या ३२ आणि राष्ट्रीय जनता दलाच्या ८ आमदारांचा समावेश आहे. न्यायालयानं काँग्रेसच्या एक आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी लेनिन गटाच्या एका आमदारालाही आपलं म्हणणं मांडायला सांगितलं आहे. विधानसभा सभापती प्रेम कुमार आणि ऊर्जा मंत्र्यांनाही नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.

**<><><><>**

शिलाँगचे खासदार आणि वॉईस ऑफ द पीपल पार्टीचे प्रमुख नेता डॉ. रिकी ए.जे. सिंगकॉन यांचं काल हृदयविकाराच्या धक्क्यानं निधन झालं. ते ५४ वर्षांचे होते. मेघालयातील राजकारणात डॉ.सिंगकॉन हे प्रमुख नेते होते. सिंगकॉन यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्म, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांनी दु:ख व्यक्त केलं.

**<><><><>**

टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत सुपर एट गटाचे सामने उद्यापासून सुरु होतील. पहिला सामना पाकिस्तान आणि न्यूझीलंड दरम्यान कोलंबो इथं होईल. सामना संध्याकाळी ७ वाजता सुरु होईल.

भारत, वेस्ट इंडीज, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड,श्रीलंका, न्यूझीलंड, झिंबाब्वे, आणि पाकिस्तान हे देश सुपर एटमधे पोहोचले आहेत. भारताचा सामना येत्या रविवारी दक्षिण आफ्रिकेबरोबर अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडीयमवर होणार आहे.

सुपर एट फेरीत न पोहोचलेले ऑस्ट्रेलिया आणि ओमान यांच्यातला सामना श्रीलंकेत पल्लिकल इथं आज होईल.

**//<><><><><>//**